**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास :–</u>**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – ईश्वर गोविंद कोकरे,

वय – ४१ वर्षे, व्यवसाय– शेती,

पत्ता – रा.येरोळ, ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–</u>**

दिनांक ०१/०९/२०१७ रोजी सकाळी ९.०० च्या सुमारास येरोळ येथे माझ्या आणि संतोष भानुदार कोकरे याच्या शेतातील बांधावर घटना घडली होती. माझ्या शेतात जाण्यासाठी आरोपीच्या शेतातून वाट आहे. माझ्या शेतात जात असताना आरोपीने या वाटेने जायचे नाही म्हणूण माझा रस्ता आडवला, मला शिवीगाळ केली, कुऱ्हाडीच्या दांड्याने माझ्या पाठीत मारहाण केली, माझ्या डोक्यात दगडाने मारुन जखमी केले, माझ्या उजव्या हाताच्या मधल्या बोटाला चावा घेवून तुकडा पाडला. त्यामूळे मी आराडा–ओरडा केला तेंव्हा आरोपीचा भाऊ अंकूश कोकरे आणि संतोषची पत्नी सत्यभामा तेथे आले. त्यांनी मला काठीने पाठीत मारहाण केली. मला शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. बालाजी कोकरे हा तेथे पळत आला त्याने सोडवासोडव केली. मी शिरुर अनंतपाळ पोलिस स्टेशनमध्ये गेलो. शिरुर अनंतपाळ पोलिस स्टेशनमध्ये मला उपचाराकरीता पत्र देवून शिरुर अनंतपाळ सरकारी दवाखाण्यात उपचाराकरीता पाठवले. तेथे मी उपचार घेतले. त्यानंतर घडलेल्या घटनेची मी आरोपींच्या विरुध्द प्रस्तूत तक्रार दाखल केली. ती तक्रार दाखवल्यास मी ओळखु शकते. (आता मला दि.०१/०९/२०१७ रोजीची तक्रार दाखवण्यात आली.) ती तक्रार मी दाखल केलेली असुन त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास

**नि.क्र.४९** देण्यात आली. (आत्ता मला जप्त मुद्देमाल नंबर ३६/२०२६ वरील मुद्देमाल दाखवण्यात आला) त्या मुद्देमलातील कुऱ्हाडीचा दांडा व काठीने मला आरोपी क्र.१ व २ ने मारहाण केली होती. सदर कुऱ्हाडीचा दांडा व काठीस अनुक्रमे आर्टीकल अ आणि ब देण्यात आले. त्या आरोपी क्र. १ ते ३ यांना मी ओळखते. आरोपी क्र.१ हजर नसून मी त्या सर्वांना ओळखतो.

**उलटतपासाकरीता आरोपी व आरोपी तर्फे विधीज्ञ बी. आर. सबनीस यांचा पुकारा केला असता गैरहजर. सबब उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.04.24 17:37:24 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

दिनांक २४/०४/२०२६. सहदिवाणी न्यायाधीश,क.स्तर न्यायालय क्र.१,

**निलंगा**